स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड
येथील सामाजीकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत
राज्यशास्त्र विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच . डी)पदवीसाठी
सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

शोधप्रबंधाचे नाव

"रत्नागिरी जिल्हयाच्या विकासातील डॉ . श्रीधर नातू यांचे योगदान" एक अभ्यास

संशोधक

श्री . प्रमोद अरविंद देसाई
पाटपन्हाळे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
मु . पो . शृंगारतळी, ता . गुहागर, जि . रत्नागिरी

मार्गदर्शक

डॉ . सर्जेराव . आर . शिंदे
प्राचार्य,
भाई किसनराव देशमुख महाविद्यालय चाकुर .
ता . चाकुर, जि . नांदेड **413513**

प्रस्तावना :-

कोणत्याही देशाचा, तेथील प्रदेशाचा किंवा समाजाचा विकास कशाप्रकारे घडुन आला आहे याचा आढावा घ्यायचा असेल तर त्या ठिकाणी असलेली शासन प्रशासनाची रचना व कार्यपध्दती कशा प्रकारची आहे ते जाणून घ्यावे लागते. स्वातंत्र्योत्तर भारताचा व राज्यघटनेनुसार भारताने स्विकारलेल्या शासन प्रशासनाचा अभ्यास विविध अंगानी केला जाऊ शकतो. भारतीय घटनाकारांनी प्रामुख्याने इंग्लंड व अमेरीकन संघराज्याच्या राज्यघटनांचा व शासनपध्दतींचा आधार घेऊन आपल्या शासनाच्या रचना व कार्यपध्दतीची तरतूद केली आहे. भारताच्या आजपर्यंच्या विकासामध्ये आपण स्विकारलेल्या शासन पध्दतीचे सर्वात जास्त योगदान आहे. हे जरी खरे असले तरी शासन प्रशासनाचे संचालन करणा–या पदावरील व्यक्तींचे म्हणजेच लोकप्रतीनीधींचे देशाच्या विकासातील योगदान दुर्लक्षीत करता येणार नाही. आजपर्यंत देशाला अशा अनेक महान व्यक्तीमत्वांचे नेतृत्व लाभले आहे. यामध्ये केंद्रातील व विविध राज्यातील नेत्यांचा,लोकप्रतीनिधींचा समावेश होतो.

देशपातळीवरील नेत्यांचा विचार केल्यास पंडीत नेहरू,लालबहाद्दूर शास्त्री,इंदिरा गांधी व अलीकच्या काळातील अटलबिहारी वाजपेयी इत्यादींचा समावेश करता येईल. तर महाराष्ट्राच्या बाबतीत विचार केल्यास श्री यशवंतराव चव्हाण,श्री वसंतराव नाईकव अलीकच्या काळातील श्री शरद पवार इत्यादींचा समावेश करता येईल. या नेत्यांच्या बरोबरच राज्याच्या ग्रामीण भागातही असे अनेक लोकप्रतीनिधी होऊन गेले आहेत की ज्यांनी आपआपल्या मतदारसंघात राजकीय,सामाजीक ,शैक्षणीक इ. प्रकारची बहुमोल कामगीरी करून आपल्या भागाचा कायापालट केला आहे. अशा अनेक स्थानीक लोकप्रतीनिधींच्या योगदानाच्या एकत्रीकरणातूनच महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीला हातभार लागला आहे.

प्रस्तूत संशोधनामध्ये रत्नागिरी जिल्हयातील अशाच लोकप्रतिनिधींपैकी डॉ. श्रीधर नातू. यांनी आपल्या कार्यक्षेत्रात केलेल्या विकासात्मक योगदानाचा आढावा घेतला जाणार आहे.

रत्नागिरी जिल्हा :-

महाराष्ट्रातील रत्नागिरी हा जिल्हा हा एक महत्वाचा जिल्हा आहे. या जिल्हयाला प्राचीन काळापासुनचा ऐतिहासीक वारसा लाभला आहे. रत्नागिरी प्रदेशावर पुर्वीपासुन ‘म्हैसुर’ ते ‘शिलाहार’आणि

‘चालुक्या’ पासुन ते ‘कंदबा’ पर्यंत विविध राजघराण्यांची सत्ता राहीली आहे. त्यानंतर हा प्रदेश ब्रिटीश राजवटीखाली आला. शेवटी स्वातंत्र्यानंतर **1948** मध्ये येथील ‘सावंतवाडी’ हे संस्थान भारतात विलीन झाले. पुढे भारतामधील ‘भाषावार’ राज्य रचनेमध्ये **1956** मध्ये रत्नागिरीचा प्रदेश ‘मुंबई या व्दिभाषीक राज्याचा भाग बनला. त्यानंतर **01** मे **1960** रोजी स्वंतत्र महाराष्ट्राची निर्मीती झाल्यानंतर रत्नागिरीचा महाराष्ट्रामध्ये समावेश झाला. महाराष्ट्राच्या निर्मीतीच्या वेळीच ‘रत्नागिरी’ जिल्हयाची स्थापना झाली. यावेळी या जिल्हयाचा विस्तार खुप मोठा होता. रायगड जिल्हयाची सिमारेषा असलेल्या ‘मंडणगड’ पासुन गोवा राज्याच्या सिमारेषा असलेल्या ‘बांदा’पर्यंत रत्नागिरी या जिल्हयाचा विस्तार होता. आधुनिक काळात विकास योजनांची अंमलबजावणी कार्यक्षमतेने व्हावी आणि शासन तसेच प्रशासन कारभार करणे सोईचे व्हावे या हेतुने मूळ रत्नागिरी जिल्हयाचे **1981** ला विभाजन करून ‘सिंधुदुर्ग‘ हा नवा जिल्हा स्थापन करण्यात आला. पुर्वीच्या विस्तृत रत्नागिरी जिल्हयामध्ये **15** तालूके होते. सध्याच्यारत्नागिरी जिल्हयामध्ये मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, गुहागर, संगमेश्वर, रत्नागिरी, लांजा व राजापूर असे **09** तालूके आहेत. यामध्ये दापोली, चिपळूण, गुहागर, रत्नगिरी, व राजापूर हे **05** विधानसभा मतदारसंघआहेत. तर सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये मात्र कुडाळ, कणकवली, रत्नगिरी, व सावंतवाडी हे **03** विधानसभा मतदारसंघआहेत.

महाराष्ट्राला लाभलेल्या सुमारे **720** कि. मी. समुद्र किनारा लाभला आहे. यापैकी कोकणाला लाभलेल्या समुद्र किनारपट्टीमध्ये असलेल्या चार जिल्हयापैकी रत्नगिरी हा एक जिल्हा आहे. या जिल्हयाला **167** कि. मी. चा समुद्र किनारा लाभला आहे. पूर्वेकडे सहयाद्रीच्या उंच अशा सलग रांगा आणि पश्चिमेला पसरलेला अथांग अरबी समुद्र या परीसिमांमध्ये रत्नागिरी जिल्हयाचे क्षेत्र व्यापले आहे. त्याची उत्तर - दक्षिण लांबी **180** कि. मी. आणि पूर्व - पश्चिम लांबी **64** कि. मी. आहे. जिल्हयाचे क्षेत्रफळ **8284**चौरस कि. मी. असून भौगोलीक स्थान उत्तर अक्षांश **16 30** ते **18 4** व रेखांश **73 2** ते **73 52** आहे. जिल्हयातील बहुतांशी लोक शेतीवरच आपली उपजीवीका चालवीतात. मात्र त्यामध्येही शेतीसाठी सलग जमीनीचा आभाव, जंगली प्राण्यांचा उपद्रव, तिव्र उताराची व सच्छीद्र जांभा दगडाची जमीन इत्यादी अनेक समस्या आहेत. बहुतेक भाग डोंगराळ व समुद्र व खाडयांनी व्यापलेला आहे. जो भाग सखल आहे

त्या ठिकाणी भात हे प्रमुख पिक घेतले जाते. इतर पूरक उद्योग थोडया प्रमाणात केले जातात. मात्र पुरेसे उत्पादन नसल्या कारणामुळे सर्वसाधारणपणे प्रत्येक घरातील एखादी व्यक्ती औद्योगीक दृष्टया प्रगत असलेल्या मुंबई शहरात नोकरी किंवा उद्योग धंदयासाठी गेलेली अढळते. मुंबईतील चाकरमान्यांकडून मिळणा-या अर्थसहाय्यावरच येथील बहुतांशी लोकांना अवलंबुन रहावे लागते. मुंबई गोवा या राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या काही मोठया शहरामध्ये थोडयाफार प्रमाणात औद्योगीकरण झाले आहे. त्यामुळे काही प्रमाणात स्थानीक पातळीवर रोजगार मिळणे शक्य झाले आहे.

नेतृत्व संकल्पना :-

पृथ्वीतलावरील सर्व प्राणीमात्रांचा अनेक वर्षापासुनचा इतिहास अभ्यासला असता असे लक्षात येते की,समुहामध्ये रहाणे ही त्यांची जन्मजात प्रवृत्ती आहे. सहाजीकच एकत्र रहाताना त्यांच्यामध्ये वेगवेगळया आंतरक्रिया घडुन येत असतात. या आंतरक्रियेतून त्यांच्यामध्ये ज्याप्रमाणे प्रेम व सहकार्य घडुन येते त्याचप्रमाणे विविध कारणावरून परस्पर संघर्ष सुध्दा घडुन येत होता. जेव्हा हा संघर्ष पराकोटीला पोहोचलातेव्हा मात्र हा संघर्ष मिटवून शांततेचे जिवन जगण्यासाठी, आपल्या जिवीत मालमत्तेला संरक्षण मिळविण्यासाठी सर्व समुहावर कोणाचेतरी नियंत्रण असावे याची त्याला गरज वाटू लागली. मानवी समुहाच्या प्रमुखाचीम्हणजेच नेतृत्वाची संकल्पना यातुनच उदयास आली. याचेच पुढील काळात राजा, शासन प्रमुख, लोकनेता या संकल्पनामध्ये रूपांतर झाले.

नेतृत्वाचा अर्थ:-

नेता किंवा नेतृत्व म्हणजे काय? याचा थोडक्यात अर्थ सांगायचा झाल्यास असे सांगता येईल की, “मानवी समुहावर आपल्या विचारांचा व कृतींचा प्रभाव निर्माण करणारी तसेच त्या समुहाचे वर्तन व विचार निश्चित करणारी त्या समुहातील सर्वश्रेष्ठ व्यक्ती म्हणजे नेता होय.” परंतु हा नेतृत्वचा परिपुर्ण अर्थ आहे असे म्हणता येणर नाही. कारण स्वंतत्र विचाराच्या व वृत्तीच्या समुहा मध्येही नेता प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष प्रभाव पाडत असतो. समुहामध्ये समन्वय साधने, त्यांना त्यांच्या विचारानुसार कृती करण्यास प्रोत्साहन देणे,

समुहाच्या समस्यांचा शोध घेणे, कठीण प्रसंगी मार्गदर्शन करणे अशा बाबी तो पार पाडत असतो. ही सर्व नेतृत्वाची लक्षणे दिसुन येतात. या सर्वामधुन 'नेतृत्व' या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट होत जातो.

नेतृत्व या संकल्पनेच्या व्याख्या विविध विचारवंतानी केल्या आहेत. यातील काहीव्याख्या खालील प्रमाणे आहेत.

1. मार्विन शॉ - मानवी समुहातील ज्या सदस्याचा अन्य सदस्यांवर सर्वाधीक प्रभाव असतो आणि जी व्यक्ती इतरांच्या आपल्या वरील प्रभावापेक्षा अधिक प्रमाणात आपला प्रभाव इतरांवर पाडत असतो अशा सदस्याला किंवा व्यक्तीला नेता म्हणतात.
2. कॅटेल - समुहामध्ये परिवर्तन घडवून आनणारी, सदस्यांचे मनोधैर्य टिकवून ठेवणारी, त्यांच्या अभिवृत्ती मध्येबदल घडवून आनणारी व्यक्ती म्हणजे नेता होय. ज्या व्यक्तीचा समुहावर निर्वीवाद प्रभाव असतो अशी व्यक्ती म्हणजे नेता होय.

या व्याख्यांचा विचार केल्यास आणि विविध मानवी समुहांचा विचार केल्यास असे अढळते की, एखादया समुहातील सर्व सदस्यांना इतरांवर आपला प्रभाव पाडण्याची संधी असते. परंतू यातील मोजक्याच व्यक्तीमध्ये इतरांवर आपला प्रभाव पाडण्याची क्षमता असते, त्यातुनच नेता बनतो. त्याच्या विशिष्ठ प्रसंगातील समुहामधील श्रेष्ठ वर्तनामुळे त्याचा इतरांच्या वर्तन व विचारावर प्रभाव निर्माण होतो.

रत्नागिरी जिल्हयातील नेतृत्व :-

निसर्ग सौंदर्याने व्यापलेला व नयनरम्य देखाव्यांनी नटलेला रत्नागिरी जिल्हा पर्यटनांच्या ठिकाणांसाठी प्रसिध्द आहे. महाराष्ट्र राज्याचे कोकणातील सांस्कृतीक केंद्र म्हणून रत्नागिरी जिल्हयाची ओळख आहे. ही माती अनेक ऐतिहासीक घटनांची साक्षीदार आहे. अनेक राजकीय, सामाजीक, चळवळी या जिल्हयामध्ये घडून गेल्या आहेत. अनेक प्रसिध्द व्यक्तीमत्वे यथे घडली आहेत. यामध्ये भारतरत्न पुरस्कार प्राप्त लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, वि. दा. सावरकर यांचा समावेश होतो. तर र. धो. कर्वे, साने गुरूजी, पा. वा. काणे, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर, गोपाळकृष्ण गोखले, रॅंग्लर परांजपे, नटसम्राट काशिनाथ घाणेकर, 'इंधन'कार हमीद दलवाई, कोकणचे

पहिले कवी माधव केशव काटदरे . इत्यादी राजकीय, सामाजीक, सांस्कृतीक क्षेत्रातील महान व्यक्तींचा समावेश होतो . यासाठीच कोकणाला व त्यातील रत्नागिरीला रत्नांची भूमी असे म्हणले जाते .

भारतामधील 'भाषावार' राज्य रचनेमध्ये **1956** मध्ये रत्नागिरीचा प्रदेश 'मुंबई या व्दिभाषीक राज्याचा भाग बनला . त्यानंतर **01** मे **1960** रोजी स्वंतत्र महाराष्ट्राची निर्मीती झाल्यानंतर रत्नागिरीचा महाराष्ट्रामध्ये समावेश झाला . यावेळी हा जिल्हा विस्ताराने खुप मोठा होता . त्यानंतर **1981** मध्ये झालेल्या रत्नागिरी जिल्हयाच्या विभाजनातुन यामध्ये सिंधुदुर्ग हा नवा जिल्हा स्थापन झाला . पुर्वीच्या रत्नागिरी जिल्हयामध्ये **15** तालुके होते . आता रत्नागिरी जिल्हयामध्ये **09** तालुके व सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये **08** तालुके आहेत . यातील रत्नागिरी जिल्हयामध्ये विधानसभेचे **05** मतदारसंघ आहेत तर सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये **03** मतदारसंघ आहेत . रत्नागिरी मधील या सर्व विधानसभा मतदारसंघातून **1962** पासुन स्थानीक पातळीवर प्रभावी नेते उदयास आले आहेत .

चिपळूण विधानसभा मतदारसंघ व नेतृत्व

रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण हे तालुक्याचे ठिकाण मुंबई या महाराष्ट्राच्या राजधानी पासुन आग्नेयेस सुमारे **175** मैल अंतरावर आहे . याच्या पश्चिमेस गुहागर तालूका आणि ऐतिहासीक दाभोळ बंदर आहे . उत्तरेस खेड तालुका, दक्षिणेस संगमेश्वर तालुका आणि पुर्वेकडे सहयाद्रीचा घाट पसरला आहे . मुंबई गोवा हा राष्ट्रीय महामार्ग क्र . **07** चिपळूण तालुक्यातून जातो .

या मतदार संघावर **1990** पासून शिवसेना या राजकिय पक्षाचे वर्चस्व राहीले आहे . परंतु **1978** व **1980** अशा दोन वेळा श्री राजाराम शिंदे निवडुन आले . **1985** मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉग्रसचे श्री निशीकांत जोशी निवडुन आले . **2004** मध्ये राष्ट्रवादी कॉग्रसचे श्री रमेश कदम निवडुन आले . परंतु **1990** मध्ये श्री बापु खेडेकर, **1995** मध्ये श्री भास्कर जाधव तर **2009** व **2014** मध्ये श्री सदांनद चव्हाण अशा चार वेळा शिवसेनेचे नेतृत्व निवडुन आले आहे . याशिवाय लोकसभा मतदार संघाचा विचार केल्यास **1952** मध्ये श्री प्रेमजीभाई असर **1962** व **1967** मध्ये शारदा मुखर्जी **1977** व **1980** श्री

बापुसाहेब परूळेकर **1984** श्री हुसेन दलवाई **1989** व **1991** श्री गोविंदराव निकम तर **1996** पासुन **2014** पर्यंत श्री अनंत गिते असे नेतृत्व चिपळुण मधुन पुढे आले आहे.

गुहागर विधानसभा मतदारसंघ व नेतृत्व

रत्नागिरी जिल्हयातील पश्चिम दिशेच्या समुद्र किनारपट्टीवर असलेला गुहागर तालुका आहे. याच्या पुर्वेला चिपळूण तालूका,पश्चिमेला अरबी समुद्र, उत्तरेला ऐतिहासीक दाभोळ बंदर व दापोलीतालूका, आणि दक्षीणेला रत्नागिरी तालूका व जिल्हयाचे ठिकाण आहे. गुहागरच्या उत्तर व दक्षीण अशा दोन्ही सिमारेषांवर समुद्र खाडया आहेत. पेशवाई राजवटी मधील महत्वाचे व्यक्तीमत्व राघोबादादा पेशवे यांच्या पत्नी आनंदीबाई पेशवे यांचे मुळ गाव ‘मळण’ हे याच तालुक्यात आहे. याशिवाय पर्यटनाचे नवे केंद्र अशी या तालुक्याची नवी ओळख निर्माण झाली आहे.

या मतदार संघावर भारतीय जनता पक्षाचे जास्त काळ सलग वर्चस्व राहीले आहे. **1962** मध्ये प्रजा समाजवादी पक्षाचे श्री पुरूषोत्तम महाडीक निवडुन आले. **1967**मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉग्रसचे श्री महादेव सोमा केसरकर निवडुन आले. **1972**मध्ये भारतीय जन संघाचेडॉ. श्री श्रीधर नातू निवडुन आले. यानंतर **1977** पुन्हा जनता पक्षाकडूनडॉ. श्रीधर नातू निवडुन आले. **1980**मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉग्रसचे श्री रामचंद्र सदाशिव बेंडल निवडुन आले. यानंतर **1985** व **1990** मध्ये पुन्हा सलग दोन वेळा भारतीय जनता पक्षाकडूनडॉ. श्रीधर नातू निवडुन आले. त्यांच्या निधनानंतर त्यांचे सुपुत्र डॉ. विवेक श्रीधर नातू यांनीही **1995, 1999**व **2004** असा सलग तिन वेळा भारतीय जनता पक्षाकडूनहा मतदार संघ आपल्या कडे राखला. यापुढे मात्र श्री भास्कर जाधव यांनी **2009** व **2014** असा सलग दोन्ही वेळाराष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाकडून या मतदार संघावर आपले वर्चस्व मिळवले आहे.

दापोली विधानसभा मतदारसंघ व नेतृत्व

मुंबई पासून **215** कि.मी. अंतरावर असलेले दापोली हे रत्नागिरी जिल्हयामधील तालुक्याचे ठिकाण आहे. याच्यापुर्वेला खेड तालुका, पश्चिमेला अरबी समुद्र, उत्तरेला मंडणगड तर दक्षिणेला गुहागर तालुका आहे. हे ठिकाण मिनी महाबळेश्वर या नावाने ओळखले जाते. दाभोळा बंदर, हर्णे बंदर, आंजर्ले,

पन्हाळेकाजीची लेणी, उन्हवरे येथील गरम पाण्याचे झरे आणि विस्तीर्ण समुद्र किनारा यामुळे हा तालुका पर्यटनासाठी प्रसिध्द आहे. ब्रिटीशपुर्व काळापासुन विविध राजांचा सागरी सत्तेसाठी या भागाशी संबंध राहिला आहे. ब्रिटीशांचा लष्करी तळ याठिकाणी होता. कोकणचे प्रसिध्द कृषी विद्यापीठ याच ठिकाणी आहे.

या मतदार संघावर **1962, 1967, 1972** मध्ये कॉंग्रेस कडुन श्री रामचंद्र विठ्ठल भोसले. **1980** मध्ये जनता पक्षाचे श्री गंगाराम दौलत सकपाळ. **1985** मध्ये कॉंग्रेस चे चंद्रकांत मोकल. यानंतर मात्र शिवसेनच्या श्री सुर्यकांत दळवी यांनी **1990** ते **2009** पर्यंत आपले वर्चस्व राखले. **2014** मध्ये मात्र राष्ट्रवादी कॉंग्रेस च्या श्री संजय कदम यांनी येथे आपली सत्ता प्रस्थापीत केली आहे.

रत्नागिरी विधानसभा मतदारसंघव नेतृत्व

रत्नागिरी हे जिल्हयाचे ठिकाण असुन हा एक विधानसभा मतदार संघ सुध्दा आहे. याच्या पुर्वेला लांजा व पश्चिमेलाअरबी समुद्र, उत्तरेला गुहागर तर दक्षिणेला राजापुर तालुका आहे. ब्रिटीशांनी स्थानबध्द केलेल्या मॅनमारच्या थिबा राजाचा राजवाडा,विर सावरकरांचे बंदीस्थान, भगवती बंदर, रत्नदूर्ग, श्रीक्षेत्र गणपतीपुळे, मार्लेश्वर मंदीर, लाईट हाऊस,मत्स्यालय, आरे वारे बिच व विस्तीर्ण सागर किनारे इत्यादी मुळे रत्नागिरी हप पर्यटनाचे प्रसिध्द ठिकाण आहे.

या मतदार संघावर कॉंग्रेस व भारतीय जनता पक्षाचे समान वर्चस्व राहीले आहे. **1962, 1967, 1972** मध्ये कॉंग्रेस कडुन श्री शांताराम लक्ष्मण पेजे. **1972** मध्येकॉंग्रेस कडुन श्री हुसेन. **1978, 1980** मध्ये जनता पक्ष व भाजप कडुन सौ कुसुम अभ्यंकर. **1984** मध्येभाजप कडुन जी. एस. रामचंद. **1990, 1995, 1999**मध्येभाजप कडुन जी. एस. रामचंद. श्री शिवाजीराव गोताड व श्री बाळ माने. **2004, 2009** व **2014** मध्ये श्री उदय सामंत यांनी अनुक्रमे राष्ट्रवादी कॉंग्रेस व शिवसेना पक्षाकडुन आपली सत्ता प्रस्थापीत केली आहे.

राजापूर विधानसभा मतदारसंघ व नेतृत्व

राजापूर हे रत्नागिरी जिल्हयातील एक तालुक्याचे ठिकाण आहे. राजपूर हे शहर इतिहास काळातील कोकणाच्या बाजारपेठेचे ठिकाण होते. तसेच राजापूर येथे सुरक्षीत बंदर असल्यामुळे येथेइंग्रजांची वखार होती. या ठिकाणी दरवर्षी उगम पावणारीगंगा प्रसिध्द आहे. याशिवाय धुतपापेश्वर मंदिर, अडीवरे गावातील महाकाली मंदिर, कशेडी गावातील सुर्यनारायणाचे मंदिर अशा ठिकाणामुळे हा तालुका प्रसिध्द आहे.

या मतदार संघावर कॉंग्रेस व शिवसेना या पक्षांचे समान वर्चस्व राहीले आहे. **1962** व **1972**मध्ये कॉंग्रेस कडुन श्री सहदेव मुकुंद ठाकरे यांचे तर **1967, 1978, 1985** व **1990** मध्ये प्रजा समाजवादी पक्ष, जनता पक्ष वकॉंग्रेस कडुनप्रसिध्द नेते श्री ल.रा.हतणकर नेतृत्व केले. यानंतर मात्र या मतदार संघावर शिवसेनेचे **1995, 1999, 2004, 2009** व **2014**असे सलग पाच वेळा अनुक्रमे श्री आप्पा साळवी, श्री गणपतराव कदम, व श्री राजन यांचेवर्चस्व राहीले आहे.

अशा प्रकारे रत्नागिरी जिल्हयातील वेगवेगळया विधानसभा मतदार संघामध्ये येथील स्थानीक नेतृत्वाने आपल्या राजकीय व सामाजीक कार्याचा ठसा उमटवला आहे. आपआपल्या कार्यकालात त्यांनी जिल्हयाच्या विकासाची धुरा सांभाळली आहे.

संशोधनाचे महत्व:-

एखादया देशाच्या विकासामध्ये तेथील शासन, प्रशासन पध्दतीची रचना व कार्यपध्दतीला जेवढे महत्व असते तेवढच त्या देशाला लाभणारे नेतृत्व सुध्दा महत्वाचे असते. आपल्या देशाला सुदैवाने केंद, राज्य व स्थानीक अशा सर्व पातळीवर चांगल्या प्रकारचे नेतृत्व लाभले आहे. देशाने केलेल्या विकासाचा आढावा घेताना या नेत्यांनी केलेल्या कार्याचा, त्यांनी राबविलेल्या धोरणांचा, त्यांच्या दूरदृष्टीचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते. या नेत्यांच्या कार्याचे संशोधन करूनच भविष्यातील वाटचालयशस्वीपणे करणे शक्य होते.

प्रस्तूत संशोधनामध्ये महाराष्ट्राच्या कोकण या प्रादेशिक विभागातील रत्नागिरी जिल्हयातील विकासाचा आढावा घेतला जाणार आहे. यातील प्रामुख्याने 'गुहागर' व 'चिपळूण' या तालुक्यांच्या आजपर्यंत झालेल्या विकासात येथील गतकाळात होऊन गेलेल्या राजकीय नेतृत्वाच्या योगदानाचा सविस्तरअभ्यास केला जाणार आहे. अशा प्रकारचा अभ्यास किंवा संशोधन यापूर्वी झालेले नाही. यादृष्टीनेच"रत्नागिरी जिल्हयाच्या विकासातील डॉ. श्रीधर नातू यांचे योगदान"एक अभ्यास. या विषयावरील संशोधनाची गरज किंवा महत्व स्पष्ट होते.

संशोधनाची उद्दिष्ठये :-

प्रत्येक संशोधनाचे उद्दिष्ठ अथवा हेतू हा गतकाळात घडून गेलेल्या कार्याचा, घटनांचा शोध घेणे व त्यातून बोध घेणे हा असतो. त्याचप्रमाणे देशाची व मानवी जिवनाची प्रगती करणे हा सुध्दा संशोधनाचा हेतू असतो. यातुन पुढील काळातील वाटचालसुलभरीतीने करणे शक्य होते. प्रस्तूत संशोधनामध्ये महाराष्ट्राच्या कोकण या प्रादेशिक विभागातील रत्नागिरी जिल्हयाच्या प्रामुख्याने 'गुहागर' व 'चिपळूण' या तालुक्यांच्या आजपर्यंत झालेल्या विकासात येथील भुतकाळातील नेत्यांच्या योगदानाचा अभ्यास केला जाणार आहे. येथे होऊन गेलेल्या नेत्यांपैकी डॉ. श्रीधर तथा तात्यासाहेब नातु यांनी सच्चा समाजसेवक व अभ्यासु राजकारणी या नात्याने बजावलेल्या भुमीकांचा अभ्यास करण्याचे प्रयोजन आहे.

या दृष्टीकोणातून प्रस्तूत संशोधनाची काही उद्दिष्टेपुढील प्रमाणे निश्चित केली आहेत.

1. राजकीय नेतृत्व ही संकल्पना सैध्दांतीक स्वरूपात जाणून घेणे.
2. रत्नागिरी जिल्हयातील 'गुहागर' व 'चिपळूण' या तालुक्यांच्या शैक्षणीक, सामाजीक व राजकीय विकासाचा आढावा घेणे.
3. डॉ. श्रीधर तथा तात्यासाहेब नातु यांच्या व्यक्तीमत्वाचा व विचारांचा परीचय करून घेणे.
4. डॉ. श्रीधर नातू यांनी केलेल्या शिक्षण प्रसाराचा तसेचसामाजीक व वैद्यकीय कार्याचा आढावा घेणे.
5. डॉ. श्रीधर नातू यांच्या राजकीयव विधीमंडळातील कार्याचा आढावा घेणे. तसेच त्यांच्या जनसंघ व भारतीय जनता पक्ष या पक्षातील योगदानाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :-

संशोधनाचा विषय व संशोधन समस्या निश्चित केल्यानंतर त्यासंबधी काही अनुमाने व काही संभाव्य उत्तरे विधानांच्या स्वरूपात मांडली जातात. या अनुषंगाने "रत्नागिरी जिल्हयाच्या विकासातील डॉ. श्रीधर नातू यांचे योगदान" एक अभ्यासया विषयावरील संशोधनाला योग्य दिशा मिळावी यासाठी काही गृहीतकांची मांडणी खालील प्रमाणे केली आहे.

1. रत्नागिरी जिल्हयातील स्थानीक नेत्यांच्या योगदानामुळेच येथील सर्वांगीण विकासाला हातभार लागला आहे.
2. 'गुहागर' व 'चिपळूण' या तालुक्यात डॉ. श्रीधर नातूंच्या योगदानपूर्व काळात शैक्षणीक सुविधांचा मोठा आभाव होता. त्यांच्या शैक्षणीक क्षेत्रातील भरीव कामगीरीमुळेच 'गुहागर' व 'चिपळूण' या तालुक्यांचा शैक्षणीक दर्जा वाढु शकला आहे.
3. या तालुक्यात डॉ. श्रीधर नातूंच्या योगदानपूर्व काळात वैद्यकीय सुविधांचा मोठा आभाव होता. ही परिस्थीती बदलण्यामध्ये त्यांचे फार मोठे योगदान आहे.
4. डॉ. श्रीधर नातूंनी आपल्या राजकीय व विधीमंडळातील कार्यातून ख-या अर्थाने कोकणाच्या ग्रामीण विकासाचे नेतृत्व केले आहे.
5. डॉ. श्रीधर नातूंचे नेतृत्व हे जाती- धर्मा पलीकडचे सर्वसमावेशक नेतृत्व होते. त्यांनी आपल्या पुढील नेत्यांसाठी ख-या समाजसेवकाचा आदर्श घालुन दिला आहे.

संशोधन पध्दती :-

सदर संशोधामध्ये उपलब्ध झालेली माहिती ही अंतर्गत व बहिर्गत परिक्षणाव्दारे त्याची सत्यता तपासून त्याचा वापर संशोधनाकरता केला जाणार आहे. यासाठी संशोधन विषयाचा आभ्यास करताना ऐतिहासीक पध्दतीचा आधार घेतला जाणार आहे.

संशोधनासाठीच्या विषयाची मांडणी करताना प्रामुख्याने प्राथमीक साधनांचाआधार घेतला जाणार आहे. यामध्ये विविध राजकीय व सामाजीक विचारवंतांनी लिहीलेल्या लेखन सामग्रीचा, संदर्भ ग्रंथाचा,

डॉ.श्रीधर नातू यांच्यावर लिहीलेल्या पुस्तकांचा आधार घेतला जाणार आहे.त्याचबरोबर दुय्यम साधनांच्या आधारे हा विषय शास्त्रशुध्द पध्दतीने मांडला जाणार आहे.यामध्येडॉ.श्रीधर नातू यांच्या समकालीन व्यक्ती, राजकीय नेते व कार्यकर्ते यांच्याशी केलेल्या चर्चा व मुलाखतींचा आधार घेऊन माहीती मिळवली जाणार आहे.राजकीय पक्षाच्या कार्यालयातून, राज्य विधीमंडळाच्या व इतर ग्रंथालयातून मिळालेल्या लिखीत तसेच अलिखीत माहीतीचा आणि वर्तमान पत्रातील बातम्यांची कात्रणे इ.चा आधार घेऊन तटस्थपणे मांडणी केली जाणार आहे.

सदरचे संशोधन हे वस्तुनिष्ठ व्हावे व त्याकरीता जास्तीत जास्त अचूक माहीती मिळावी यासाठी वरील साधनांच्या आधार घेतला जाणार आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती :-

प्रस्तूत संशोधनाचा विषय “रत्नागिरी जिल्हयाच्या विकासातील डॉ.श्रीधर नातू यांचे योगदान” एक अभ्यास हा आहे.त्यासाठी या संशोधनामध्ये महाराष्ट्राच्या कोकण या प्रादेशिक विभागातील रत्नागिरी जिल्हयातील विकासाचा आढावा ढोबळमानाने घेतला जाणार असला तरी यातील प्रामुख्याने ‘गुहागर’ व ‘चिपळूण’ या तालुक्यांच्या आजपर्यंत झालेल्या विकासाचा आढावा हे या संशोधन विषयाचे अभ्यास कार्य क्षेत्र आहे.तसेच येथील गतकाळात होऊन गेलेल्या राजकीय नेतृत्वाच्या योगदानाचा परामर्श संशोधन विषयाचे महत्व दर्शविण्यासाठी घेतला जाणार आहे. असे असले तरी या नेतृत्वा मध्ये डॉ.श्रीधर नातू यांचे विशेष योगदान असल्यामुळे त्यांचे राजकीय सामाजिक वैद्यकिय व शैक्षणीक कार्याचा आढावा अशी या संशोधन विषयाची व्याप्ती असणार आहे.

यामध्ये प्रामुख्याने डॉ.श्रीधर नातू यांची **1967** ते **1995** या काळातील राजकीय कारकीर्द हा या संशोधन अभ्यासाचा आवाका असणार आहे.

संशोधन आराखडा :-

कोणतेही संशोधन करताना निश्चित स्वरूपाची उद्दिष्ठ नजरेसमोर ठेऊन संशोधकाला संपुर्ण संशोधनाची आखणी किंवा मांडणी करावी लागते. ही आखणी अतीशय महत्वाची असते. कारण यामुळे निश्चित केलेल्या उद्दिष्ठानुसार योग्य दिशेने संशोधन कार्य करणे शक्य होते. तसेच योग्य निष्कर्षापर्यंत संशोधन पोहोचण्यास मदत होते. प्रस्तूत संशोधनातील शोधप्रबंधाचा आराखडा किंवा त्यातील प्रकरणांची रूपरेषा ढोबळमानाने खालील प्रमाणे केली आहे.

1. प्रस्तावना
2. रत्नागिरी जिल्हयातील नेतृत्वाचा आढावा.
3. डॉ. श्रीधर तथा तात्यासाहेब नातू - व्यक्ती परिचय
4. डॉ. नातू यांचे सामाजीक,शैक्षणीक व राजकीय क्षेत्रातील योगदान
5. निष्कर्ष व समारोप

प्रकरण पहिले. प्रस्तावना :-

या प्रकरणामध्ये राजकीय नेतृत्व या संकल्पनेचा अभ्यास करताना याचा अर्थ, विविध विचरवंतानी मांडलेल्या व्याख्या तसेच नेतृत्वासंबंधी मांडलेल्या विविध सिध्दांतांचे विश्लेषण केले जाणार आहे. त्याचप्रमाणे प्रतिकूल परिस्थिती हाताळण्याची क्षमता, जनसंपर्क व जनसंचय कला,शासन व जनता यातील संसूचन, जनतेवरील प्रभाव क्षमता अशा नेतृत्वाच्या विविध बाजूंचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण दुसरे. रत्नागिरी जिल्हयातील नेतृत्वाचा आढावा :-

शोधप्रबंधाच्या या दुस-या प्रकरणामध्ये महाराष्ट्राच्या कोकण या प्रादेशिक विभागातील रत्नागिरी या जिल्हयाची तसेच यातील गुहागर व चिपळूण तालुक्यांचीऐतिहासीक पार्श्वभूमी, भौगोलीक स्थान इ. ची सविस्तर माहीती मांडली जाणार आहे. त्याचप्रमाणे येथील स्वातंत्र्यपूर्व व स्वातज्योत्तर काळातील नेतृत्वाचा आणि त्यांच्या बहुमोल कार्याचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण तिसरे . डॉ . श्रीधर तथा तात्यासाहेब नातू - व्यक्ती परिचय :-

महाराष्ट्र राज्याचे कोकणातील सांस्कृतीक केंद्र म्हणून रत्नागिरी जिल्हयाची ओळख आहे . हे ठिकाण अनेक ऐतिहासीक घटनांचे साक्षीदार आहे . अनेक राजकीय, सामाजीक नेते या जिल्हयामध्ये होऊन गेले आहेत . यापैकी गुहागर व चिपळूण तालुक्याच्या सर्वांगीण विकासामध्ये मोलाचे योगदान दिलेल्या डॉ . श्रीधर नातू यांच्या व्यक्तीमत्वाचा व विचाराचा परिचय या तिस-या प्रकरणा मध्ये करून दिला जाणार आहे .

प्रकरण चौथे . 4 . डॉ . नातू यांचे सामाजीक, शैक्षणीक व राजकीय क्षेत्रातील योगदान :-

रत्नागिरी मधील गुहागर व चिपळूण तालुक्यांचा आज जो काही विकास दिसुन येत आहे, त्यातील अनेक विकासकामांची सुरूवात डॉ . नातूंनी केली होती . त्यांच्या पूर्वकाळात येथे शैक्षणीक सुविधांचा मोठा आभाव होता . नागरीकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या सुविधा फारश्या उपलब्ध नव्हत्या . राजकारणामध्ये येण्याच्या पुर्विपासूनच त्यांनी या सर्व प्रतीकुल परिस्थितीवर मात करण्यास सुरूवात केली होती . डॉ . नातूंच्या सामाजीक, वैद्यकीय, व शैक्षणीक कार्याचा सविस्तरआढावायेथे घेतला येथे जाणार आहे . त्याचप्रमाणे जि . प . सदस्य व पुढे राज्याचे आमदार झाल्यावर खरा समाजकारणी व राजकारणी म्हणून त्यांनी केलेल्या कामगीरीचे सविस्तर विश्लषण या प्रकरणामध्ये कोले जाणार आहे .

प्रकरण पहिले . 5 . निष्कर्ष व समारोप :-

या शेवटच्या प्रकरणा मध्ये अनुक्रमानुसार सर्व प्रकरणांचा सारांश व उपसंहार घेतला जाणार आहे . संशोधनाच्या अंती हाती आलेल्या सर्व निष्कर्ष सविस्तरपणे येथे मांडले जाणार आहेत . तसेच काही शिफारशी सुचवून शोधप्रबंधाचा समारोप केला जाणार आहे .

निवडक संदर्भ सूची :-

1 . डॉ . ना . रा . खेकाळे . राजकीय नेतृत्व श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 1999

2 . रॉबीन शर्मा . नेतृत्वाची गुरूकिल्ली जयको पब्लीशिंग हाऊस

3 . प्रा . वा . ना . अभ्यंकर . नेतृत्वाचे पैलू छात्र प्रबोधन

4 . प्रकाश पवार . भारतीय नेतृत्व आणि नेतृत्वाची वाटचाल डायमंड पब्लीकेशन पूणे

5 . डॉ . पंतोजी शेळके डॉ . आदिनाथ डोके . व्यवसाय व्यवस्थापन डायमंड पब्लीकेशन पूणे 2014

6 . प्रा सुरेष भिरूड प्रा भास्कर नाफडे व्यवस्थापनाची तत्वे व पध्दती डायमंड पब्लीकेशन पूणे ऑगस्ट 2009

7 . Gazetter of the Bombay Presidence (Ratnagiri and Sawantwadi) Vol.X,The Government Photozinco press, Pune 1996.

8 . गुरूनाथ नाडगोंडे . सामाजीक संशोधन पध्दती फडके प्रकाशन

9 . डॉ . ढगे . एस . के . संशोधन पध्दती के . एस . पब्लीकेशन पूणे 2011

10 . आगलावे प्रदीप संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन नागपुर 2000

11 . डॉ महेंदळे विश्वास यशवंतराव ते विलासराव अनुबंध प्रकाशन,पूणे 2007

12 . डॉ पाटील वा भा संशोधन पध्दती प्रशांत पब्लीकेशन पूणे 2006

संशोधकाची स्वाक्षरी

श्री . प्रमोद अरविंद देसाई
पाटपन्हाळे कला,वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय मु . पो . शृंगारतळी,
ता . गुहागर, जि . रत्नागिरी

मार्गदशकाची स्वाक्षरी

प्राचार्य,
भाई किसनराव देशमुख महाविद्यालय चाकुर .
ता . चाकुर, जि . नांदेड 413513